# दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि. पंढरपूर

## १०५ व्या वार्षीक सर्वसाधारण सभेची सूचना (फक्त सभासदांकरिता)

बँकेचे सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपले बँकेची १०५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२४/०९/२०१७ रोजी सायंकाळी ठिक ५.३० वाजता बँकेचे कर्मयोगी सभागृह, शाखा नवीपेठ, खवाबाजार, पंढरपूर येथे आयोजित केलेली आहे. त्यावेळी खालील विषयांवरती विचार विनीमय होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

### ⁕ सभेपुढील विषय ⁕

१) मागील दि.१४/०९/२०१६ रोजी झालेल्या १०४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि.३१/०३/२०१७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक इत्यादी स्विकारणे व मंजूर करणे. तसेच मा.वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेला वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

३) मा.वैधानिक लेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ सालाकरीताच्या दोष दुरूस्ती अहवालाची माहिती घेणे व स्विकृती देणे.

४) मा.संचालक मंडळाने सुचविल्याप्रमाणे सन २०१६-१७ चे नफ्याच्या विनियोगास मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.

५) सन २०१७-१८ सालाचे बँकेचे उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक मंजूर करणे. मागील वर्षाचे मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

६) सन २०१७-१८ सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणेबाबत.

७) समावर्ती/अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

८) बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्राच्या बाहेर विस्तारीत करणेसाठी मल्टिस्टेट को-ऑप.सोसायटी ॲक्ट २००२ प्रमाणे बॉयलॉज स्विकृत करणे व बहुराज्यीय बँकेत रूपांतर करणेचा प्रस्ताव केंद्रीय निबंधक, नवी दिल्ली यांचेकडे दाखल करणे व त्या संबंधीचे अधिकार मा.संचालक मंडळास देणे.

९) दि महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० अधिनियम ७५(२) प्रमाणे बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.

१०) या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

११) सन २०१७-१८ साला करीता बाहेरून कर्ज उभारणीची कर्ज मर्यादा ठरविणे.

१२) बँकेच्या शाखेच्या कामकाजासाठी खरेदी करावयाच्या जागेची माहिती अवगत करणेबाबत.

१३) अध्यक्षांचे परवानगीने आयते वेळी येणारे विषयांचा विचार करणे.

पंढरपूर

मा.संचालक मंडळाचे आदेशावरून,

**दिनांक:** ०१/०९/२०१७

श्री.उमेश रामचंद्र विरधे

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

---

**विशेष सूचना :**

१) सभेस आवश्यक असलेली गणसंख्या जर सायंकाळी ५.३० वाजे पर्यंत झाली नाही तर ती सभा तहकूब केली जाईल. अशी तहकूब केलेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी सायंकाळी ठिक ६.०० वाजता मुळ सभेच्या विषय पत्रिकेवरील कामकाज पार पाडणेसाठी भरेल. त्यासाठी नियमानुसार गणसंख्या आवश्यक असणार नाही.

२) ९७ व्या घटना दुरूस्तीच्या अनुषंगाने सभासदांसाठी सहकार कायदा कलम २४(अ) अन्वये ''सभासद प्रशिक्षण कार्यक्रम'' याच दिवशी याच ठिकाणी दु.४.३० वा. आयोजित केलेला आहे. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून आपली जबाबदारी पार पाडावी.

३) सन २०१६-१७ सालाचा अहवाल ताळेबंद व नफा तोटा पत्रक इत्यादी आर्थिकपत्रके बँकेचे प्रधान कार्यालय व सर्व शाखा येथे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेले आहेत. मागणी केल्यास ते उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केलेली आहे.

४) ज्या सभासदांना बँकेचे कामकाजा संबंधी सभेत प्रश्न विचारावयाचे असतील किंवा सूचना करावयाच्या असतील त्यांनी मंगळवार दि.१९/०९/२०१७ रोजी दु.६.०० वाजेपर्यंत प्रधान कार्यालय, पंढरपूर यांचेकडे लेखी कळवावे. तद्नंतर आलेल्या प्रश्नांचा सदर सभेमध्ये विचार केला जाणार नाही.

**सभासदांना सूचना :**

१) ज्या सभासदांनी मागील वर्षाचा लाभांश नेला नसेल त्यांनी तो न्यावा. तसेच बँकेत बचत खाते उघडावे म्हणजे लाभांश ताबडतोब जमा करता येईल. बँकेचे पोटनियम क्रं.५८(ड) अन्वये लाभांशाची रक्कम जाहीर केलेल्या तारखेपासून तीन वर्षापर्यंत नेणे बंधनकारक आहे अन्यथा शिल्लक रक्कम राखीव निधी खातेस वर्ग करणेत येईल.

२) ज्या सभासदांनी वारसाची नोंद केली नसेल त्यांनी फॉर्म भरून वारसाची नोंद करून घ्यावी.

३) सभासदांच्या पत्त्यात बदल झाला असल्यास नवीन पत्ता तसेच आपला मोबाईल क्रमांक व ई-मेल अॅड्रेस बँकेकडे त्वरीत कळविणेत यावा. तसेच सभासदांनी आपले केवायसी कागदपत्रांची पुर्तता त्वरीत करावी.

४) बँकेचे पोटनियम क्रं.१२(१) नुसार सभासदांनी पुर्वीचे त्यांचे नावांवर असलेले रू.१०/-, रू.५०/- व रू.५००/- चे भाग निकष मर्यादा रू.१०००/- चे पटीत दि.३१/३/२०१८ पुर्वी करून घेणे अत्यावश्यक आहे.

५) सन २०१६-१७ चा ताळेबंद व नफा तोटा पत्रक बँकेच्या www.pandharpurbank.com या संकेत स्थळावर पाहता येईल.